**तापी पाटबंधारे विकास महामंडळ ,जळगांव) महाराष्ट्र( यांचेकडून प्राप्त झालेल्या "कुऱ्हा वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजना "या नियोजित उपसा सिंचन प्रकल्प रायगांव ता .मुक्ताईनगर ,जि .जळगाव) उपसा(, साठवण तलाव ,इस्लामपूर तालुका जळगांव) जामोद ( जि .बुलढाणा या प्रकल्पाबाबत दि. ३०.११.२०२३ रोजी प्रकल्प स्थळ ,कन्स्ट्रक्शन कँम्प , इस्लामपुर धरण) डॅम (जवळ, गांव इस्लामपूर ,ता .जळगांव जामोद .जि .बुलढाणा येथे दुपारी १२.३० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---------------

तापी पाटबंधारे विकास महामंडळ ,जळगांव) महाराष्ट्र (यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या **"कुऱ्हा वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजना "**या नियोजित उपसा सिंचन प्रकल्प रायगांव ता . मुक्ताईनगर ,जि .जळगाव) उपसा(, साठवण तलाव ,इस्लामपूर तालुका जळगांव) जामोद (जि .बुलढाणा येथे उभारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे मंजुरी करीता प्राप्त झालेला होता. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. 14.09.2006 च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. ३०.११.२०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता **प्रकल्प स्थळ ,कन्स्ट्रक्शन कँम्प , इस्लामपुर धरण) डॅम (जवळ, गांव इस्लामपूर ,ता .जळगांव जामोद .जि .बुलढाणा** येथे घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ मुंबई यांनी आदेश क्र. E-७६ of २०२३ पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-२३११०२-FTS-२३४ दि. ०२.११.२०२३ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते.

1. मा. श्री शैलेश काळे, उपविभागीय दंडाधिकारी, जळगाव जामोद — अध्यक्ष
2. श्री. सं. दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी
   म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
3. श्री म. दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी,
   म.प्र.नि. मंडळ, अकोला — आयोजक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. २६.१०.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि.३०.११.२०२३ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जळगाव जामोद, श्री शैलेश काळे यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम श्री. म.दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

तापी पाटबंधारे विकास महामंडळ ,जळगांव) महाराष्ट्र( यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-

यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. पर्यावरण विभाग, नविन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा.
३. सह -संचालक (जल प्रदूषण नियंत्रण मंडळ ), महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पांइट 2 रा व 4था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु), मुंबई-४०००२२.
४. प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ सहकार सुरभी, विवेकानंद कॉलनी जवळ, बापटवाडी, अमरावती-४४४६०४.
५. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, हुतात्मा स्मारक समोर, नेहरू पार्क चौक, अळशी प्लॉट, अकोला -४४४००१.
६. जिल्हा परीषद कार्यालय, बुलढाणा.
७. जिल्हा उदयोग केंद्र, बुलढाणा.
८. उपविभागीय अधिकारी, जळगांव जामोद, मलकापूर, जिल्हा बुलढाणा.
९. तहसील कार्यालय, जळगांव जामोद, नांदुरा, मलकापूर, जिल्हा बुलढाणा.
१०. नगर पंचायत, संग्रामपुर, ता. संग्रामपुर, जिल्हा बुलढाणा.
११. गट ग्रामपंचायत, वडगांवगड ता.जळगांव जामोद जिल्हा बुलढाणा.
१२. ग्रामपंचायत, असलगांव, धानोरा, नाव (खुर्द), पळशी सुपो, रसलपुर, खेर्डा खुर्द व सुनगांव ता.जळगांव जामोद, जिल्हा बुलढाणा.

श्री. म. दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी अकोला यांनी प्रकल्प समन्वयक यांना सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी प्रकल्पाबाबत सादरीकरण केले.

श्री. म. दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी अकोला यांनी सांगीतले की, सदर प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री जबरोददीन पटेल, रा. इस्लामपूर यांनी विचारणा केली की, आपल्या मार्फत जे सोलर व वॉटर प्युरीफायर देण्यात येणार आहेत ते कोणत्या गावांना देण्यात येणार आहेत. सोलर व वॉटर प्युरीफायर चा लाभ प्रकल्पग्रस्त गावांनाच देण्यात यावे.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले की, या प्रकल्पामार्फत सोलर सिस्टीम देण्यात येणार नसुन सोलर पथदिवे देण्यात येणार आहेत. हे पथदिवे प्रकल्प बाधीत गावांना प्राधान्याने देण्यात येतील.

श्री जायदोददीन पटेल, रा. बोरगाव शंभू यांनी सांगीतले की, ज्या लोकांची जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे त्यांना प्राथम्याने काम देण्यात यावे. प्रकल्पातर्फे नोकरी देण्यात बाबत सुदधा आश्वासन देण्यात आले होते.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले की, या प्रकल्पामार्फत प्रकल्प सुरू झाल्यापासून आतापर्यंत 23000 लोकांना वेळोवेळी कामाचा लाभ देण्यात आलेला आहे. मात्र प्रकल्प प्रत्यक्षात चालू झाल्यानंतर स्थानिक लोकांना रोजगार देण्यात येईल.

श्री सहदेव दामोदर, रा. इस्लामपूर यांनी सांगीतले की, या प्रकल्पासाठी सन २००९-२०१० पासून शेतीची खरेदी करण्यात आलेली आहे. मात्र खरेदी कमी दराने करण्यात आली. सदर खरेदी केलेल्या जमीनीला आत्ताच्या खेरदीचा दर देण्यात यावा.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले की, यापूर्वी एकुण ४२४ प्रकरणांमधे खाजगी वाटाघाटीने खरेदी करण्यात आलेली आहेत. ज्या जमीनीची खरेदी पूर्वी करण्यात आलेल्या आहेत त्यांना आता भाव वाढवून देणे शक्य नाही.

श्री सहदेव दामोदर, रा. इस्लामपूर यांनी विचारणा केली की, या धरणाचे काम कधी पूर्ण होणार तसेच शेतकऱ्यांना याचा लाभ कधी मीळणार.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, सदर धरणाचे काम हे ६० टक्के पूर्ण झालेले आहे. पर्यावरण मान्यता नसल्यामुळे काम थांबलेले आहे. पूढील दोन महिन्यांमधे मान्यता मिळेल अशी आशा आहे. यापूढील कामे निधी उपलब्धतेनुसार करण्यात येतील.

श्री सहदेव दामोदर, रा. इस्लामपूर यांनी विचारणा केली की, मागील वर्षामधे प्रकल्पासाठी २२२६ कोटी निधी प्राप्त झाला अशी बातमी न्युजपेपरला आली होती. तरीही प्रकल्पासाठी निधी नाही हे कसे शक्य आहे.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, या प्रकल्पासाठी २२२६ कोटीची प्रशासकिय मान्यता ही महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली आहे. मात्र पर्यावरण मान्यता अदयाप मिळालेली नाही.

श्री सहदेव दामोदर, रा. इस्लामपूर यांनी विचारणा केली की, पर्यावरण मान्यता नाही तरीही काम प्रकल्पाचे काम कसे चालू आहे.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, सन २०१०-२०११ मधे प्रकल्पाची पर्यावरणीय सुनावणी घेण्यात आली होती. मात्र पर्यावरणीय कायदयांचे उल्लंघन झाल्याने त्याप्रमाणे नविन प्रस्तावानुसार पर्यावरणीय लोकसुनावणीचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री सहदेव दामोदर, रा. इस्लामपूर यांनी विचारणा केली की, शेतकरी सरळ खरेदी करून देण्यास तयार असूनही आपण भूसंपादन का करत आहात.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, काही शेतकऱ्यांनी सन २०१७-२०१८ मध्ये सरळ खरेदीसाठी मान्यता दिली नाही. त्यामुळे भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

श्री संतोष माजरे, रा. वडगाव गड यांनी सांगीतले की, मी 3 वर्षापूर्वीच सरळ खरेदीने जमीन खरेदी करणेबाबत मान्यता दिली आहे.

श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी मा. अध्यक्षांना सरळ खेरदीस मान्यता देण्यात यावी अशी विनंती केली.

यावर मा. अध्यक्षांनी सरळ खरेदीचे प्रस्ताव असतील तर ते त्याच स्वरूपात स्विकारण्यात येतील असे सांगीतले.

श्री सुखदेव वानखडे, रा. नावखुर्द यांनी सांगीतले की, त्या काळातील खेरदी हया शेतक-यांवर दबाव टाकून त्यांना आमिश दाखवून करण्यात आल्या. एकाही व्यक्तीला काम देण्यात आलेले नाही. प्रमाणपत्रानुसार नोकरीही देण्यात आलेली नाही.

श्री शेख सादीक शेख बहादुर, रा. वडगाव यांनी सांगीतले की, शेतीची खरेदी करून दिली नाही तर जिल्हाधिकारी यांचे मार्फत जमीनीची खरेदी करण्यात येईल असे धमकावण्यात आले. माझी एकुण 4 एकर शेती होती. त्याबाबतचे प्रमाणपत्र सुदधा देण्यात आले नाही. धरण होत आहे हे चांगले काम आहे. मात्र आमच्या शेतीला आजच्या भावाप्रमाणे भाव देण्यात यावा.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले केले की, जमीनीच्या खेरदीचा दर हा मा. जिल्हाधिकारी यांचे समीतीच्या शिफारशीनुसार ठरत असतो आणि त्यानुसार दिला जातो.

श्री ओंकार दाभाडे यांनी सांगीतले की, माझ्यासमोर कोणत्याच साहेबांनी कोणत्याही शेतकऱ्याला शेतीची खरेदी जबरदस्तीने करून देण्याबाबत धमकावलेले नाही.

श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, जमीनीच्या विषयासंबंधी प्रश्नांबाबत मा. अध्यक्ष व मा. जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठक घेवून विषय निकाली काढण्यात येईल. मात्र जमीनी संबंधीत जे विषय असतील त्यांचे लेखी स्वरूपात निवेदन देण्यात यावे.

श्री आदीलखॉ नजीरखॉ यांनी सांगीतले की, माझ्या शेतीचा गट नं. १०२ आहे. माझी १३ एकर जमीन होती. त्यापैकी ७.५ एकर शेती धरणात गेली. उर्वरीत ७.५ एकरात जायला मला रस्ता नाही. मला शेतीत जाण्यासाठी बैलगाडीचा रस्ता देण्यात यावा.

याबाबत श्री उत्तम दाभाडे, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले केले की, या विभागाचे कर्मचारी/ अधिकारी आपल्या शेतीला भेट देतील व याबाबत मार्ग काढण्यात येईल.

श्री राजेंद्र गांधी यांनी सांगीतले की, मागील अनेक वर्षापासून धरण होणार आहे अशी चर्चा आहे. कोरडवाडू पटटयाला अजुनही पाणी मिळत नाही. धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून शेतक-यांना लाभ दयावा अशी सर्व शेतकऱ्यांतर्फे विनंती आहे.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (म. दे. भिवापुरकर) | ( सं. दे. पाटील ) | ( शैलेश काळे ) |
| संयोजक | सदस्य | अध्यक्ष लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | उपविभागीय दंडाधिकारी |
| अकोला | अमरावती | जळगाव जामोद, जि. बुलढाणा |